जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 APR 2026

लोकमत

# शाश्वत शेतीसाठी संस्थांची एकजूट आवश्यक

## मास्तोळी : विद्यापीठात खरीप हंगामपूर्व कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शेतीसमोरील वाढत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषी विभाग, विद्यापीठे आणि संबंधित संस्थांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन विभागीय कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी केले.



तज्ज्ञांनी ऊस, भात, सोयाबीन, भाजीपाला लागवड, सेंद्रिय शेती, कुक्कुटपालन व शासकीय योजनांवर मार्गदर्शन केले.

कृषी विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि 'आत्मा' कोल्हापूर यांच्यातर्फे आयोजित 'शाश्वत शेती-समृद्ध शेतकरी' या खरीप हंगामपूर्व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगारे यांनी खरीप हंगामाच्या तयारीचा आढावा घेतला. कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी ऊस, भात, सोयाबीन, भाजीपाला लागवड, सेंद्रिय शेती, कुक्कुटपालन व शासकीय योजनांवर मार्गदर्शन केले. तसेच 'भरड धान्यांचा चमत्कार' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाला दिनेशजी कुलकर्णी, डॉ. नितीन माळी यांच्यासह कृषी अधिकारी, शास्त्रज्ञ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

27 APR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'द मिरॅकल ऑफ मिलेटस' पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी**,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'द म्रियाकल ऑफ मिलेटस् : लोकल ग्रेन्स्, मॉ डर्न वंडर्स" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ, राज्य शासनाचा कृषी विभाग व भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृध्दीसाठी या विषयावर आयेजित एकदिवसिय परिषदेत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी, कृषी उपसंचालक तथा जिल्हा नोडल अधिकारी नामदेव परीट, राजेंद्र माने, जिल्हा कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र प्रमुख डॉ.विद्यासागर गेडाम, यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकासचे प्रभारी संचालक डॉ.नितिन माळी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.



**कोल्हापूर : पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, बसवराज मास्तोळी, नामदेव परीट, राजेंद्र माने, जालिंदर पांगरे आदी.**

इंटरनॅशनल इयर ऑफ मिलेटच्या पार्श्वभूमीवर फुड सेफ्टी स्टॅंडर्ड ऑफ इंडिया द्वारे प्रायोजित ईट राईट मिलेट मेला या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये राज्यभरातील विविध विद्यार्थ्यांनी वेगवेगळे प्रोडक्ट तयार केले होते. यातूनच, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्त शिंदे यांना या पुस्तक निर्मितीची मूळ कल्पना सुचली. तसेच, विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांनी या पुस्तकाच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन दिले.

या पुस्तकासाठी शितल पाटील, डॉ. स्नेहल खांडेकर, डॉ. प्रविणकुमार पाटील, डॉ. इराण्णा पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष

2 7 APR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# शाश्वत शेती, कृषी अर्थव्यवस्थेची क्षमतावृद्धी परिषद विद्यापीठात उत्साहात

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृध्दी विषयावर विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये एक दिवसीय परिषद आयोजित केली होती. यामध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले "द मिऱ्याकल ऑफ मिलेटस् : लोकल ग्रेन्स्, मॉडर्न वंडर्स" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

हा प्रकाशन सोहळा सुरूवातीला विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, कृषी सहसंचालक बंसवराज मास्तोळी, कृषी उपसंचालक तथा जिल्हा नोडल अधिकारी नामदेव परीट, राजेंद्र माने, जिल्हा कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेचे प्रभारी संचालक डॉ. नितिन माळी यांच्या हस्ते झाला.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत आपण आरोग्य, पोषण आणि पर्यावरण या तिन्ही बाबींशी झगडत आहोत. अशा परिस्थितीत मिलेटस् अर्थात पारंपरिक भरड धान्याचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित होत आहे. ही भरड धान्य केवळ अन्नधान्य नव्हे तर आपल्या संस्कृतीचा, शाश्वत शेतीचा व आरोग्यदायी जीवनशैलीचा आधार आहेत. या पुस्तकामध्ये मिलिटस् अर्थात भरडधान्यांचे वैज्ञानिक, पोषणात्मक, तांत्रिक परिचय तसेच त्यांचे मूल्यवर्धित अन्न प्रक्रिया यांची सखोल पणे मांडणी केली आहे.

या पुस्तकामध्ये विविध भरड धान्यांची वर्गीकरण, जिल्हास्तरीय राज्यस्तरीय तसेच देशस्थरीय उत्पादन स्थिती, पोषणमूल्य त्यावर आधारित मूल्यवर्धित उत्पादने आणि त्यांचे आरोग्यदायी फायदे यांचा सविस्तर आढावा या पुस्तकात दिलेला आहे. हे पुस्तक केवळ विद्यार्थ्यांसाठी किंवा संशोधकांसाठी नव्हे तर शेतकरी उद्योग क्षेत्र आणि सामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल.

शिवाजी विद्यापीठ नेहमीच समाज उपयोगी विविध उपक्रमाचे आयोजन करत असते. अशाच इंटरनॅशनल इयर ऑफ मिलेटस्च्या पार्श्वभूमीवर "फुड सेफ्टी स्टैंडर्ड ऑफ इंडिया" अर्थात एफएसएसएआय, मुंबई द्वारे प्रायोजित "ईट राईट मिलेट मेला" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा कार्यक्रम पूर्णपणे मिलेटवर आधारीत होता. यामध्ये राज्यभरातील विविध विद्यार्थ्यांनी वेगवेगळे प्रोडक्ट तयार केले होते. यातूनच, व्यवस्थापन परिषद सदस्य शिंदे यांना या पुस्तक निर्मितीची कल्पना सुचली. तसेच, विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि कुलसचिव यांनी या पुस्तकाच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन दिले.

2 7 APR 2026

क्रांतिसिंह

# विद्यापीठात रंग कुंचल्याचे स्पर्धा



विद्यापीठाच्या हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह सर्वच शिक्षकांनी रंग कुंचल्याचे या स्पर्धेत होते.

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागामार्फत नुकताच जागतिक कला दिन आणि जागतिक वारसा दिन असा संयुक्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यापीठात या निमित्ताने रंग कुंचल्याचे ही स्पॉट पेंटींग स्पर्धा शनिवारी घेण्यात आली. विशेष म्हणजे या स्पर्धेत हिंदी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विभागातील सर्व शिक्षकही स्पर्धक म्हणून सहभागी झाले.

स्पर्धेत हिंदी अधिविभागातील शिक्षक विद्यार्थ्यांसह भाषा प्रौद्योगिकी, संगीत व नाट्यशास्त्र आणि एमबीए या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी व संशोधकांनीही सहभाग घेतला. सर्वांनीच स्वतःला रंगांच्या दुनियेत हरवून चित्रकलेचा आनंद घेतला. वि.स. खांडेकर भाषा भवनच्या मागील तलावाजवळ पार पडलेल्या या स्पर्धेत डॉ. प्रकाश निकम, डॉ. गीता दोडमणी, डॉ. जयसिंग कांबळे, प्रतीक्षा तुंबरे आदींनी सहभाग घेतला तसेच संयोजन केले.